तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : diplomadesk1odte@gmail.com Internet : http://dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक : १०/एडीएम/पदविका/२०१५/ ८६८
दिनांक : - 3 AUG 2015

विषय:- शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाचा व अपलोडिंगचा अंतिम दिनांकाबाबत...

संदर्भ:- १. या संचालनालयाची ॲडमिशन नोटिफिकेशन-१ क्रमांक १०/एडीएम/डीएसडी/२०१५/५३६ दि. १८.६.२०१५.
२. शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२००८/(५२/०८)/तांशि-१ दि. २९.३.२००८ व मान्यता-२०१५/(४८/१५)/तांशि-५ दि. १९.५.२०१५.

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधिन नोटिफिकेशनच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, या संचालनालयाच्या गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांचे समुपदेशन फेरीमार्फत संस्थास्तरावर दि. २०.७.२०१५ ते ३१.०७.२०१५ पर्यंत केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेतंर्गत प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांची यादी अद्याप काही संस्थांनी अपलोड केलेली नाही. तरी, सर्व संस्थांनी थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी दि. २०.७.२०१५ ते ३१.०७.२०१५ पर्यंत कॅप अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी दिनांक ०४.०८.२०१५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत या संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करावी. यानंतर यादी अपलोड केल्यास त्याबाबत संदर्भ क्रमांक २ मध्ये नमुद केलेल्या शासन निर्णयानुसार संबंधित संस्थावर योग्य ती दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

तसेच दि. ०१.०८.२०१५ पासुन कॅप व्यतिरिक्त संस्थास्तरावर करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा व अपलोडिंगचा अंतिम दिनांक खालीलप्रमाणे जाहीर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | प्रवेश प्रक्रियेचा तपशील | संस्थास्तरावरील कॅप व्यतिरिक्त प्रवेशाचा अंतिम दिनांक (Cut off Date) | संस्थास्तरावरील कॅप व्यतिरिक्त प्रवेशित विद्यार्थ्यांचे अपलोडिंगचा अंतिम दिनांक (Last Date of Uploading) |
|---|---|---|---|
| १. | शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील थेट व्दितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम | १०.०८.२०१५ | २०.०८.२०१५ |

वरील मुदतीत प्रवेश न करणाऱ्या व प्रवेशाची माहिती अपलोड न करणाऱ्या संस्थांवर संदर्भिय शासन निर्णयानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल, यांची संबंधितांनी नोंद घ्यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण, म.रा.,मुंबई

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर.
क्र :—तंशिसं / विकाना / पदविका / २०१५ / 2519
दि. - 6 AUG 2015

प्रति,
प्राचार्य,
सर्व पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था,
नागपूर विभाग , नागपूर.

सदर परिपत्रक सर्व संस्थांच्या माहितीकरिता. त्यांना कळविण्यात येते की, संचालनालयाचे सदर परिपत्रातील सूचनांची नोंद घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

( गुलाबराव ठाकरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर.

प्रत:- प्रोग्रामर , यांनी सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.